**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी 25 हजार 972 कोटी 69 लाख रुपयांच्या तरतूदीस प्रशासकीय मान्यता; नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील १ लाख ९६ हजार सहाशे हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार.**
2. **बुलडाणा जिल्ह्यात केस नख गळतीच्या आजारावर नियंत्रणासाठी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे केंद्रीय पथकाला निर्देश.**
3. **देशात सोन्याच्या दराने गाठला तोळ्यामागे १ लाख रुपयांचा टप्पा.**
4. **विदर्भात पुढचे दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा; चंद्रपूरचे तापमान 45 अंश सेल्सिअसवर.**

**गोसीखुर्द**

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या कामासाठी २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत चौथी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पामुळे नागपूर, चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यातील १ लाख ९६ हजार सहाशे हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. गोसीखूर्द राष्ट्रीय प्रकल्प हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्याद्वारे राबविण्यात येत आहे. गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यात वैनगंगा नदीवर गौसीखुर्द (ता.पवनी) येथे हा बहुउद्देशीय प्रकल्प साकारण्यात येत आहे. सिंचन, पिण्यासाठी पाणी, औद्योगिक पाणी पुरवठा, मत्स्यव्यवसाय आणि जलविद्युत निर्मिती असा हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पातून खुले कालवा वितरण, उपसा सिंचन व बंदिस्त नलिका वितरण या पद्धतीने नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्राला लाभ होणार आहे. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट आहे.

**मंत्रिमंडळ निर्णय**

स्त्री शिक्षणाची मशाल पेटवणाऱ्या आद्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी मौजे नायगाव (ता. खंडाळा, जि. सातारा) येथे भव्य स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मौजे नायगाव येथील या स्मारकासाठी 142 कोटी 60 लाख रुपये तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी 67 लाख 17 हजार रुपयांच्या तरतूदीस मंजूरी देण्यात आली. राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणेच पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णयही आज झाला. मत्स्यव्यसायातील प्रक्रिया उद्योग वगळता अन्य घटकांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.राज्यातील सहा विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयांतील कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या अधिकाऱ्यांना सध्या एकत्रितरित्या पस्तीस हजार रुपये मानधन देण्यात येते. हे मानधन

कमी असून, ते वाढविण्याबाबपत विधी अधिकाऱ्यांकडून निवेदन देण्यात आले होते. त्यांच्या मागणीचा विचार करून दरमहा पंचेचाळीस हजार रुपये मानधन आणि दूरध्वनी आणि प्रवास खर्चापोटी पाच हजार रुपये देण्यास मंजूरी देण्यात आली. यामुळे या विधि अधिकाऱ्यांना 50 हजार रुपये मानधन मिळणार आहे.

**प्रतापराव जाधव**

बुलढाणा जिल्हयातील काही गावांमध्ये केस गळतीचे आणि त्यानंतर नख गळतीचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष आरोग्य  कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केंद्र सरकारच्या पथकाला या आजाराच्या मुळाशी जाऊन कार्य करण्याचे निर्देश दिले. याप्रसंगी त्यांनी या आजाराच्या प्रतिबंधाविषयी माहिती दिली

***आपल्या बुलढाणा जिल्हयामध्ये विशेषकरून शेगाव, खामगाव आणि काही नांदुरातल्या एक दोन गावमध्ये मागच्या काळामध्ये अडीच  तीन महिन्यापूर्वी केस गळतीचा प्रकार झाला होता. त्यावर सुद्धा आपण तात्काळ दिल्लीवरून आयसीएमआरची टीम त्या ठिकाणी बोलवली  होती. त्यावर उपचार करायचा प्रयत्न केला आणि आपल्याला त्यामध्ये चांगला यश सुद्धा मिळाला होता.पण आता काही दिवसामध्ये त्या  पेशंटमध्ये नखांवर नखाचे तुकडे जाण्याचा किंवा नसतात त्या केसेस या ठिकाणी काही समोर केसेस  झाले आहे. त्यासाठी सुद्धा आपण दिल्लीवरून, मुंबई, पुणे सगळं चार पाच विभागाच्या टीम आपण बोलावल्या आहे.***

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, रुग्णांना पुन्हा त्रास होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत . तसेच या आजाराचे मूळ कारण शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करा. यासाठी रुग्णांचे रक्ताचे नमुने तसेच बाधित गावातील पाणी, माती, धान्य आदींचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या  सुचना दिल्या. केंद्रीय पथक दोन दिवस बांधीत गावाला भेटी देणार असून रुग्णांशी भेटी घेऊन आजाराचे मूळ कारण शोधणार आहे. त्यामुळे नागरिकांनी केंद्रीय पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रताप जाधव यांनी यावेळी केले.

**जागतिक वसुंधरा दिवस**

पर्यावरण रक्षणाला पाठिंबा देण्यासाठी आज जागतिक वसुंधरा दिवस साजरा होत आहे. १९६९ साली युनेस्कोच्या शिखर परिषदेत झालेल्या ठरावानंतर १९७० मध्ये पहिला जागतिक वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला. 'आपली शक्ती, आपला ग्रह', ही यंदाच्या वसुंधरा दिनाची संकल्पना आहे. राष्ट्रीय आपत्ती  प्रतिसाद दल अकादमी एनडीआरएफ नागपूर तर्फे आज पृथ्वी दिवसाच्या निमित्ताने एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी, विद्यार्थ्यांमध्ये आणि इतर विविध भागधारकांमध्ये शाश्वत विकासासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी  चित्रकला आणि रेखाचित्र स्पर्धा आयोजित केली होती ज्यामध्ये एकूण ५१ मुलांनी भाग घेतला होता.डीरडीई डिफेंस रिसर्च डेव्हलपमेंट इस्टेब्लेंशमेंट चे प्रभारी अधिकारी बिधान चंद्र बाग आणि प्रदेशिक सेंद्रीय शेती केंद्र

नागपूरचे डॉ.अजयसिंह राजपूत हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या चित्रकला स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषकाचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

**नागरी सेवा परीक्षा निकाल**

संघ लोकसेवा आयोग अर्थात UPSC च्या २०२४ च्या नागरी सेवा परीक्षाच्या निकालात शक्ती दुबे देशात पहिल्या क्रमांकावर आहे. हर्षित गोयल दुसऱ्या आणि अर्चित डोंगरे तिसऱ्या स्थानी आहे. अर्चित हा  पुणे येथील असून राज्यात तो प्रथम आला आहे. यावेळी एकूण १००९ उमेदवारांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली आह. त्यात १८० IAS साठी, ५५ IFS साठी आणि १४७ उमेदवार IPS साठी निवडले गेले आहेत.

**सोने दर**

देशात सोन्याच्या किमतींनी आज तोळ्यामागे १ लाख रुपयांची पातळी ओलांडली. इंडियन बुलियन अँड ज्वेलरी असोसिएशनने दिलेल्या दरांनुसार सकाळी व्यवहार सुरू झाला तेव्हा २४ कॅरेट सोनं प्रति तोळा १ लाख २ हजार रुपयांपेक्षा महाग मिळत होतं. २२ कॅरेट सोन्याचे दर १ लाख १ हजार ६०० रुपयांपेक्षा अधिक झाले होते. कालच्या तुलनेत सोनं सुमारे अडीच हजार रुपयांनी महागलं. चांदी सुमारे ९८ हजार ८०० रुपये किलोनं मिळत होती. कमोडिटी बाजारातही सोन्याचे व्यवहार १ लाख रुपयांच्यावर होत आहेत. जगभरातल्या केंद्रीय बँकांनी वाढवलेली सोनं खरेदी तसंच सोनं ही सुरक्षित गुंतवणूक वाटत असल्यानं गुंतवणूकदार सोनं खरेदीकडे वळत असल्याचं तज्ञांचं मत आहे.

**हवामान**

विदर्भात पुढचे  2 दिवस उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. आज विदर्भात सर्वात जास्त तापमानाची नोंद चंद्रपूर येथे 45. पूर्णांक  6 अंश सेल्सियस करण्यात आली आहे तर नागपूरच आजच कमाल तापमान 43 पूर्णांक 6 अंश होत. आजपासून 24 तारखेपर्यंत विदर्भातील नागपूर वर्धा चंद्रपूर अमरावती अकोला येथे उष्णतेच्या लाटेची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून अमरावती चंद्रपूर वर्धा नागपूर येथे 24 तारखेला अतिदक्षतेचा ऑरेंज अलर्ट हवामान खात्याने घोषित केला आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंटस आणि दिल्ली कॅपिटल्स दरम्यान लखनऊ इथं सामना होणार आहे.  संध्याकाळी  साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**अपघात**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील पाथरी गावाजवळ एकाच दुचाकीने चार जण रात्री 11 वाजेच्या सुमारास जात असताना विरूद्ध दिशेने येणाऱ्या खाजगी  वाहनाने जोरदार धडक दिली. यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक महिला जखमी असल्याने तीला रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान या महिलेचा सुद्धा मृत्यू झाला. मृतांमध्ये पाच वर्षीय मुलीचा देखील समावेष आहे. कैलाश मरकाम, पारबता मरकाम,

यामिनी कंगाली 5 वर्षीय, आणि  दुर्गा कंगाली अशी मृतांची नाव आहे. या संदर्भात गोबरवाही पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**वक्फ कायदा**

गरीब मुस्लिमांच्या भल्यासाठीच वक्फ कायद्यात सुधारणा केल्याचा पुनरुच्चार केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रीजिजू यांनी आज केला. मुंबईत ते वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. लवकरच वक्फ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली जाणार असून जगातली सर्वात मोठी वक्फ मालमत्ता देशात असल्याचं ते म्हणाले.

'**एक राष्ट्र, एक निवडणूक**'

'एक राष्ट्र, एक निवडणूक' या विषयावर संयुक्त संसदीय समितीची बैठक आता सुरु आहे. एकोणचाळीस सदस्याच्या या बैठकीत लोकसभेतले सत्तावीस तर राज्यसभेतले बारा खासदार सहभागी झाले आहेत.वारंवार होणाऱ्या निवडणूकांमुळे व्यवस्थेवर सतत तयारीचा ताण येतो. तसंच विद्यार्थी, शिक्षक आणि पर्यायाने शिक्षणपद्धतीवर सुद्धा ताण येतो. यामुळे एक देश एक निवडणूक ही संकल्पना राष्ट्रहिताची असल्याचं संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी.पी. चौधरी यांनी बैठकीपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं.

*****